# पोलीस अधीक्षक कार्यालय, अकोला

## दरपत्रक मागविण्याबाबत प्रसिध्दीपत्रक

## दरपत्रक सादर करण्यास मुदतवाढ (प्रथमवेळ)

**विषय :- गुन्हे शोधक श्वान खरेदी करण्यासाठी दरपत्रके मागविणेबाबत.**

पोलीस अधीक्षक, अकोला यांच्या अधिपत्याखालील गुन्हे शोधक श्वान पथकासाठी **एकूण ०२ (दोन) गुन्हे शोधक श्वान** खरेदी करावयाचे आहेत. त्यासाठी शासकीय/मान्यताप्राप्त निकषानुसार पात्र असलेल्या श्वान पुरवठादार संस्था/विक्रेते यांचेकडून खालील तपशीलानुसार दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | वस्तूचे नाव | संख्या | आवश्यक बाबी |
|---|---|---|---|
| १ | गुन्हे शोधक श्वान | ०२ | वय अंदाजे ६ ते 9 आठवडयाचे, उत्तम आरोग्य, शारीरिकदृष्ट्या सक्षम, दृष्टी, वास घेण्याची क्षमता व श्रवणशक्ती उत्तम असणे आवश्यक |
| 02 | श्वानाची जात | -- | कामाच्या प्रकारानुसार बेल्जियन मॅलिनॉइस/ डॉबरमन मान्यताप्राप्त जातीतील श्वान विचारात घेण्यात येतील |

**दरपत्रक सादर करण्याच्या अटी व शर्ती-**

1. पुरविण्यात येणारे श्वान हे निरोगी, शारीरिकदृष्ट्या सक्षम व प्रशिक्षणास योग्य असावेत.
2. श्वानाचे वय खरेदीच्या वेळी ६ ते 9 आठवडयाचे असणे अपेक्षित आहे.
3. श्वानाची दृष्टी, वास घेण्याची क्षमता, श्रवणशक्ती, दात, कान, नाक, नख इत्यादींची पशुवैद्यकीय तपासणी करण्यात येईल.
4. श्वानामध्ये कोणताही संसर्गजन्य अथवा आनुवंशिक आजार नसावा.
5. श्वानासंबंधी जन्मतारीख, जात, लिंग, लसीकरण, आरोग्य प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे पुरवठादाराने सादर करणे बंधनकारक राहील.
6. पुरवठादार संस्था/ विक्रेता संबंधित शासकीय/मान्यताप्राप्त प्राधिकरणाकडे नोंदणीकृत असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे. (दि इंडीयान नॅशनल कॅनल क्लब किंवा दि कॅनल क्लब ऑफ इंडीयाचे रजिस्ट्रेशन असने आवश्यक आहे. श्वान विक्रेत्याच्या कॅनल क्लब ची नोंदणी कॅनल क्बल ऑफ इंडीया येथे झालेली असने आवश्यक आहे )
7. दरपत्रकामध्ये श्वानाची किंमत, GST/इतर कर, वाहतूक खर्च व इतर सर्व शुल्क स्वतंत्रपणे नमूद करून एकूण दर स्पष्टपणे दर्शवावा.
8. श्वानाची निवड ही केवळ सर्वात कमी दराच्या आधारे न करता, त्याची जात, वय, आरोग्य, शारीरिक क्षमता, कामासाठीची उपयुक्तता व पशुवैद्यकीय तपासणी यांचा विचार करून करण्यात येईल.
9. श्वान खरेदीपूर्वी आवश्यक ती पशुवैद्यकीय तपासणी करण्यात येईल. तपासणीत अपात्र ठरलेला श्वान स्वीकारला जाणार नाही.
10. दरपत्रक बंद लिफाफ्यात गुन्हे शोधक श्वान खरेदीसाठी दरपत्रक असे नमूद करून सादर करावे.
11. दरपत्रक सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ :- <u>१२-१०-२०२६</u> कार्यालयीन वेळेत
12. दरपत्रक सादर करण्याचे ठिकाण : पोलीस अधीक्षक कार्यालय, अकोला.
13. प्राप्त दरपत्रक स्वीकारणे अथवा कोणतेही दरपत्रक स्वीकारणे/नाकारण्याचा अधिकार पोलीस अधीक्षक, अकोला यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे.

**(मा. पोलीस अधीक्षक यांचे मान्यतेने)**

**(दिगंबर वनारे)**
**कार्यालय अधिक्षक**
**पोलीस अधीक्षक कार्यालय अकोला.**

D/Dog Unut/Khadya Kharedi Order